विशेष लेख क्र.२०९ | २ कार्तिक १९२७ (सायं. ५.३० वा.)
सोमवार, दि. २४ ऑक्टोबर २००५

## महाराष्ट्र : १०९ तीर्थक्षेत्रांची कामे प्रगतीपथावर

***राज्यात सर्वत्र सर्व देवतांची पूजा जनता सन्मानाने करीत असते. नवरात्र, गणेशोत्सव, रमजान ईद, नाताळ असे सर्वच सण साजरे केले जातात. या सर्वांच्या प्रगतीसाठी महाराष्ट्र शासनही प्रयत्नशील आहे. ग्रामीण भागात खरा भारत आपणास पाहावयास मिळतो, ग्रामदेवतांची देवळे आणि ग्रामीण भागातील तिर्थक्षेत्रांच्या विकासासाठी आघाडी शासनाचे प्रयत्न सुरु आहेत. गेल्या वर्षभरातील घेतलेल्या निर्णयांचा हा छोटासा आलेख...***

ग्रामीण भागातील तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी दिवसेंदिवस देवदर्शनासाठी भाविक/यात्रेकरुंची संख्या मोठया प्रमाणात वाढत आहे. अशा ठिकाणी भाविक व यात्रेकरुंना विविध नागरी सोयी-सुविधा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना (उदा. ग्राम पंचायत) त्यांच्या तुटपुंज्या उत्पन्नामुळे पुरविणे शक्य होत नाही. म्हणून राज्य शासनाने ग्रामीण भागातील तिर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थाना अनुदान देण्याची योजना सुरु केली. या योजनेअंतर्गत गावातील तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी अंतर्गत रस्ते, पाणी पुरवठयाची व्यवस्था करणे, सार्वजनिक स्वच्छतागृहे, वाहनतळ, यात्रीनिवास, रस्त्यांवरील दिवाबत्ती आणि जल बगीचा इत्यादी सुविधा निर्माण केल्या जातात.

ग्रामीण तिथक्षेत्रांची वर्गवारी खालील तीन प्रकारात करण्यात आलेली आहे. अ वर्गामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय महत्त्वाची ठिकाणे आणि ज्यासाठी केंद्र सरकारकडून तसेच परराष्ट्राकडून सहायक अनुदान प्राप्त होते. तर ब वर्गात राज्य स्तरावरुन निधी उपलब्ध करुन देण्यात येणारी तिर्थक्षेत्रे यांचा समावेश करण्यात आलेला आहे आणि क वर्गामध्ये स्थानिक पातळीवर प्रसिद्ध असलेली तीर्थक्षेत्रे, ज्याला जिल्हा नियोजन व विकास समिती नियतव्यय मंजूर करते, अशा तीर्थक्षेत्रांचा समावेश करण्यात आलेला आहे.

राज्यात जिल्हा पातळीवर १०९ ठिकाणी तिर्थक्षेत्रांची कामे प्रगतीपथावर आहेत. ज्याकरिता संबंधित जिल्हयाच्या जिल्हा नियोजन व विकास समित्या नियतव्यय उपलब्ध करुन देतात. या व्यतिरिक्त राज्य स्तरावरील एकूण २४ ठिकाणी तिथक्षेत्रांची कामे प्रगतीपथावर आहेत.

सन २००५-२००६ या वर्षासाठी जिल्हा स्तरावर ८७३.३९ लाख रुपये व राज्य स्तरावर २२५० लाख रुपये असे एकूण ३१२३.३९ लाख रुपये इतका नियतव्यय मंजूर केला आहे. ग्रामविकास विभागाने यासाठी पुढाकार घेतला असून, राज्य शासन तिर्थक्षेत्रांच्या विकासासाठी अथक प्रयत्न करीत आहे.

- श्रीपाद नांदेडकर
वरिष्ठ सहायक संचालक (माहिती)

०००

एसडीओरके/२४ऑक्टोबर२००५